पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 13/11/2019 (बुधवार)
(सकाळ)

---

## जबरी चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर वार्ड क्र. 3, खापरखेडा येथे दिनांक 11/11/2019 चे 22.15 वा. सुमारास फिर्यादी नामे– मयुर रमेशजी धुर्वे, वय 20 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 जयभोले नगर, चनकापुर हा रोडने पायदळ जात होता. दरम्यान फिर्यादी जवळील मोबाईल विवो कंपनीचा व्हाय 81 कि. 5,000/–रू. दोन अज्ञात आरोपीतांनी मोटरसायकलने मागुन येऊन बळजबरीने हिसकावुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 392, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ रामेश्वर कटरे हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर पेठीचुहा येथे दिनांक 12/11/2019 चे 17:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मारीया ज्योती संजु आलेसीस, वय 45 वर्ष, रा. पेठीचुहा यांच्या घराचे कंपाउड समोर गाई बैल आले असता ''गाई बैल कोणाचे आहे, सांभळता येत नाही का'' असे म्हटले. या कारणावरून आरोपी नामे– विनय रमेश आलासीस, रा. पेठीचुहा याने फिर्यादीला शिवीगाळ करून हाताबुक्कीने तोंडावर नाकावर मारल्याने फिर्यादीचे वरचे दोन दात तुटले व नाकातुन रक्त निघाले. तसेच आरोपीने फिर्यादीस पुन्हा मारपीठ करण्याची घमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार धवराळ हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापा :– दि. 11/11/2019 चे 21:00 वा. चे सुमारास 32 वर्षीय पीडित/फिर्यादी ही लहान मुलीसोबत घरा बाहेर झोपली असता आरोपी नामे– गजानन प्रभाकर ठाकरे, रा. नंदापुर याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ)(ब) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ विजय बारई हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर